## <u>अंतिम हुकुमनामा अर्ज क्र. 1/२०२० मधील  निशाणी ८० वरील आदेश</u>

**<u>सी.एन.आर.क्र.एमएचएसआय-०५००००६७२०२०</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र.१ ग यांनी  निशाणी ३३ येथील 'कोर्ट कमिशन अहवालावर म्हणणे नाही' असा झालेला आदेश रद्दबातल करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. सामनेवाला क्र.१ग यांचे संक्षिप्त रुपात असे कथन आहे की, सामनेवाला क्र.१ग हे त्यांच्या उदरनिर्वाहाच्या व्यवसायामध्ये, तसेच त्यांच्या वयोवृध्द आईच्या वैद्यकीय उपचारांमध्ये व सेवाशुश्रुषेमध्ये व्यस्त असल्यामुळे ते आपल्या वकिलांना वेळेत भेटू शकले नाहीत व कोर्ट कमिशन अहवालावर त्याचे म्हणणे सादर करणेकरीता आवश्यकती माहिती वकिलांना वेळेत देऊ शकले नाहीत. त्यामुळे सदर अहवालावर त्यांच्या तर्फे म्हणणे देणेस विलंब झाल्याने त्यांच्याविरुध्द 'म्हणणे नाही’ असा आदेश पारीत करणेत आलेला आहे. सामनेवाला क्र.१ग यांचे कोर्ट कमिशन अहवालावर म्हणणे दाखल करुन घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सामनेवाला यांचे म्हणणे दाखल करुन न घेतल्यास त्यांचे पैशाच्या रुपात कधीही न भरुन येणारे असे अपरिमित स्वरुपाचे नुकसान होणारे आहे. सबब, त्यांच्याविरुध्द झालेला 'कोर्ट कमिशन अहवालावर म्हणणे नाही'  आदेश रद्दबातल करुन त्यांचे म्हणणे स्वीकारण्यात यावे ही विनंती प्रस्तुत अर्जान्वये केलेली आहे.

३. अर्जदारातर्फे वकिलांनी प्रस्तुत अर्जावर तोंडी विरोध दर्शवून अर्ज नामंजूर करावा अन्यथा अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास सामनेवाला क्र.१ग याच्यावर जास्तीत जास्त खर्च आकारण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जातील कारण व अभिलेखाचे परिक्षण केले असता सामनेवाला क्र. १ग विरुध्द निशाणी ३३ येथील 'कोर्ट कमिशन अहवालावर म्हणणे नाही' असा आदेश पारीत झालेला दिसून येत नाही. परंतु, कोर्ट कमिशन अहवाल हा दि. १७/०९/२०२१ रोजी दाखल असून सामनेवाला क्र.१ग यांनी कोर्ट कमिशन अहवालावर म्हणणे सादर करण्याकरीता दि. ३०/०४/२०२५ रोजी अर्ज दाखल केला

आहे. त्यामुळे सामनेवाला क्र. १ग याने सदरील अहवालावर म्हणणे देण्यास विलंब केल्याचे स्पष्ट होते. नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार कोणत्याही अर्जाचा निकाल गुणवत्तेवर अंतिमरित्या होण्याकरीता दोन्ही पक्षांना समान संधी देणे अपेक्षित आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.१ग यांचे म्हणणे अभिलेखावर घेणेची संधी त्यांना देणे अपेक्षीत आहे. या कारणमिमांसेआधारे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. निशाणी ८० येथील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १ग यांना कोर्ट कमिशन अहवालावर म्हणणे देणेसाठी झालेला विलंब रक्कम रुपये ५००/- एवढी रक्कम तालुका विधीसेवा प्राधिकरण यांच्याकडे भरणा करण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE
Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2025.06.13 18:06:06 +0530

दिनांकः- ११/०६/२०२५.

(एस.जे.चिवटे)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), वेंगुर्ला.